# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच. डी.

(Doctor of Philosophy)

पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

(Synopsis)

## संशोधन विषय

**“ ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)”**


**संशोधक**

श्री मुक्कनवार एस.व्ही.

**संशोधक मार्गदर्शक**

प्रा. डॉ. ए. टी. शिंदे

प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक
राजीव गांधी महाविद्यालय,
मुदखेड जि. नांदेड

**संशोधन केंद्र**

सामजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**नोव्हेंबर – 2025**

## " ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)"

### 1. प्रस्तावना :

समुह करून राहणाऱ्या व्यक्तीमध्ये असणारी सहसंबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय. थॉमस पेज यांच्या म्हणण्याप्रमाणे सामाजिक परस्परसंबंधाचे विणलेले जाळे म्हणजे समाज होय. समाजातील या सामजिक संबंधाचे वैशिष्ट्य असे आहे की, ते सुटे-सुटे किंवा पृथक स्वरूपाचे नसतात. तर ते एकमेकांत गुंतलेले असतात. जशी वस्त्राच्या विणकामात व्यवस्था असते. तशीच समाजात परस्परसंबंधाच्या धाग्यांची व्यवस्था असते. विविध भूमिका, समूह, सामाजिक संकेत, रूढी, परंपरा, लोकरीती इत्यादी सांस्कृतिक मूल्ये ही समाजाच्या संरचनेची मूलघटक होत. हे घटक सापेक्षतः स्थिर असतात. पण काळ व परिस्थितीनुसार त्यांच्यात बदल होऊ शकतो. प्रत्येक समाज सापेक्षतः स्वयंपूर्ण किंवा आत्मनिर्भर असतो. म्हणजे समाजातील लोकांच्या उदरनिर्वाहविषयक गरजा भागविण्याची व्यवस्था त्या त्या समाजाने केलेली असते. कुटुंब, धर्म, अर्थ, शिक्षण, राज्य या विविध सामाजिक संस्था म्हणजे समाजाच्या विविध गरजा भागविण्याच्या यंत्रणाच होत.

'मानव' हा एक समाजशील प्राणी आहे. त्यामुळे मानवास समाजाशिवाय राहणे केवळ अशक्यप्राय आहे, नव्हेतर समाजाशिवाय मानवाचे अस्तित्वच नाही. मानवाची प्रगती व सामाजिक स्थिती ही तो ज्या समाजात राहतो त्या समाजाच्या दर्जेदार स्थितीवर अवलंबून असते. म्हणजेच मानवाच्या सर्वांगीण उन्नतीवरही अवतीभवतीच्या समाजाचा परिणाम होत असतो. सध्यकालीन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाजाच्या सीमारेषा, अस्मिता व अस्तित्वाला अनेक प्रकारचे धक्के बसत आहेत. वैश्विकरणाच्या  रेट्यामुळे व्यापारी व भांडवलशाहीचा अंमल वाढून स्थानिक उत्पादनक्षमता श्रमशक्ती व शिक्षणप्रणाली यामध्ये मूलगामी परिवर्तन घडून येत आहे.

## 1.1 भारतीय समाजाचे प्रकार:

### I. आदिवासी समाज:

एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा व राहणीमान असणारा तसेच समान सांस्कृतिक जीवन जगणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

### II. ग्रामीण समाज :

ग्रामीण समाज म्हणजे ज्या समाजमध्ये खुल्या जमिनीसाठी रहिवाशांचे प्रमाण कमी आहे आणि ज्यामध्ये अन्नपद्धार्थ, तंतू आणि कच्च्या मालाचे उत्पादन हे सर्वात महत्वाचे आर्थिक क्रियाकलाप असतात.

ग्रामीण समाज म्हणजे खेड्यामध्ये राहणारा, कृषी आणि पूरक व्यवसायावर अवलंबून असणारा, मर्यादित लोकसंख्येचा समाज होय.

### III. शहरी समाज :

उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध असणारा, रोजगाराच्या उच्चसंधी असणारा, दाट लोकसंख्येच्या, भरपूर विषमता असणारा समाज म्हणजे शहरी समाज होय.

## 1.2 शिक्षणाच्या संदर्भाने समाजाचे तीन प्रकारे वर्गीकरण :

### I. सुशिक्षित समाज :

ज्या समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त असते व कुटुंबात बहुतांश साक्षर सदस्य असतात अशा समाजास सुशिक्षित समाज असे म्हणतात. सुशिक्षित समाजातील व्यक्तींना शिक्षणामुळे रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी मिळतात. सुशिक्षित समाज ग्रामीण समाजाच्या तुलनेत शहरी समाजात अधिक प्रमाणात आढळतो.

### II. अल्पशिक्षित समाज :

ज्या समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण अल्प असते व कुटुंबातील सर्व सदस्य साक्षर नसतात अशा समाजास अल्पशिक्षित समाज असे म्हणतात. अल्पशिक्षित समाजातील व्यक्तींना शिक्षणाच्याअभावी रोजगाराच्या संधी कमी मिळतात. अल्पशिक्षित समाज हा ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात आढळतो.

III. **निरक्षर समाज :**

ज्या समाजात साक्षरतेचे प्रमाण शून्य असते व कुटुंबातील सर्व सदस्य निरक्षर असतात अशा समाजास निरक्षर समाज असे म्हणतात. असा समाज सध्यस्थितीत कुठेही आढळत नाही.

## 1.3. समाज आणि शिक्षण यांचा सहसंबंध:

समाज आणि शिक्षण यांचा अतिशय जवळचा सहसंबंध आहे. शिक्षणव्यवस्था ही समाजाचे अविभाज्य अंग आहे. ज्या समाजात शिक्षणाचे प्रमाण व सुविधा जास्त आहेत, त्या समाजाचा विविध पैलूंनी विकास झाल्याचे पाहायला मिळते. औद्योगिकीकरणाच्या व स्पर्धेच्या आजच्या युगात शिक्षणाशिवाय व्यवसायाची, कुटुंबाची, समाजाची व पर्यायाने राष्ट्राची सर्वांगीण प्रगती होणे शक्य नाही. म्हणूनच म्हणतात ना, ‘ शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे’ हे अगदी सत्य आहे.

## 1.4 शिक्षण आणि सामाजिक आर्थिक विकास यांचा सहसंबंध :

समाजातील चुकीच्या चालीरिती, कुप्रथा आणि अनिष्ट परंपरा यांना पुसून काढणारी साबण म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे व्यक्तीच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. त्यांचे अनुभवाचे क्षेत्र वाढते. त्यांच्या मन, मनगट व मेंदूचा विकास होतो. त्यामुळे अशी व्यक्ती समाजकारण, अर्थकारण, राजकारण इत्यादी क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण करून स्वतःची सामाजिक आणि आर्थिक उन्नती साध्य करतो. एकूणच शिक्षणामुळे निकोप, विकासाभिमुख व जागरूक समाजाची निर्मिती होते.

### 1.5 ग्रामीण समाजाची सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमी व स्थिती :

भारत हा खेड्यांचा देश आहे. आजमितीला भारतात 6 लाख खेडे आहेत. भारताची प्रगती खेड्यांच्या विकासावर अवलंबून आहे. म्हणूनच महात्मा गांधी म्हणाले होते, ‘ खेड्याकडे चला’. सन 2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 72.81 % लोकसंख्या खेड्यात राहते. खेड्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती व शेतीशी संबंधित पारंपरिक व्यवसाय हाच आहे. कृषी हा ग्रामीण भागाचा कणा असून अनेक समस्यांचा सामना करत आहे. आजच्या भारतातील ग्रामीण समाजात शहरांच्या तुलनेत पायाभूत सुविधांचा अभाव, रोजगाराची कमतरता दिसून येते. सोबतच आजही अज्ञान, अंधश्रद्धा, रोगराई यांचे प्रमाण बरेचसे दिसून येते. अशावेळी शिक्षण हाच ग्रामीण भागाच्या विकासाचा प्रमुख मार्ग आहे.

### 1.6 शहरी समाजाची सामाजिक व शैक्षणिक स्थिती :

‘शहरी समाज’ हा औद्योगिकीकरणाची देण आहे. उद्योगधंदे, कारखाने, दळणवळण, पायाभूत सुविधा यांचा विकास शहरांमध्ये वेगाने झालेला आहे. यामुळे रोजगार व उद्योगासाठी ग्रामीणांचा ओढा शहराकडे वाढला आहे. शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, संस्कृती यातील सुधारणांमुळे शहरातील समाजजीवन ग्रामीण समाजजीवनापेक्षा उन्नत, समृद्ध बनत गेले.

### 1.7 ग्रामीण समाज व शहरी समाजाची तुलनात्मक शैक्षणिक सद्यकालीन स्थिती :

ग्रामीण समाजामध्ये शहरी समाजाच्या तुलनेत शिक्षणाच्या सोयीसुविधाचा बराच अभाव दिसून येतो. शहरी भागात सेमीइंग्रजी शाळा सर्वत्र आढळतात. सोबतच CBSE, ICSE व इतर दर्जेदार राष्ट्रीयस्तरावरील अभ्यासक्रम शिकविणाऱ्या अनेक खाजगी इंग्रजीशाळा आणि महागडे खाजगी शिकवणीवर्ग सुद्धा उपब्लध आहेत. तर ग्रामीण भागात सरकारी शाळा असून त्यामध्ये राज्यशासनाचा मराठी अभ्यासक्रम शिकविला तसेच ग्रामीण समाजामध्ये शहरी समाजाच्या तुलनेत उच्चप्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि व्यावसायिक महाविद्यालये यांची कमतरता आहे. सोबतच ग्रामीण भागातील शाळांमध्ये शहरी भागाच्या तुलनेत भौतिक सुविधा, शिक्षक

संख्या, इतर कर्मचारी संख्या यांचा तुटवडा आहे आणि असे असले तरी ग्रामीण शाळामधून शिकलेल्या विद्यार्थ्यांची NEET, JEE, IIT, CA, UPSC, MPSC, KVS, SSC, NVS, RRB अशा अनेक उच्चशिक्षणाच्या व नौकरीच्या प्रवेशासाठी शहरी मुलांसोबत स्पर्धा करावी लागते, ज्यामध्ये त्यांची पिछाडी होतांना दिसून येते.

## I. वयोगट आणि समाज : साक्षरता प्रमाणाची तुलना

| Age | Rural | | | | Urban | | | | Rural + Urban |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Male | Female | Person | % Gender Gap | Male | Female | Person | % Gender Gap | % Gender Gap (Rural + Urban) |
| **2007-08 (NSS 64th round)** | | | | | | | | | |
| Age 5 & above | 76.8 | 57.3 | 67.3 | 25.4 | 89.7 | 78.1 | 84.2 | 12.9 | 21.9 |
| Age 7 & above | 77 .0 | 56.7 | 67.0 | 26.4 | 89.9 | 78.1 | 84.3 | 13.1 | 22.6 |
| Age 15 & above | 71.8 | 47.5 | 59.7 | 33.8 | 88.7 | 74.6 | 82.0 | 15.9 | 28.4 |
| All ages | 68.4 | 51.1 | 60.0 | 25.3 | 82.2 | 71.6 | 77.1 | 12.9 | 21.9 |
| **2014 (NSS 71st round)** | | | | | | | | | |
| Age 5 & above | 80.3 | 62.4 | 71.4 | 22.3 | 91.0 | 80.9 | 86.1 | 11.1 | 18.5 |
| Age 7 & above | 79.8 | 61.3 | 70.8 | 23.2 | 91.1 | 80.8 | 85.9 | 11.3 | 19.4 |
| Age 15 & above | 75.0 | 53.1 | 64.1 | 29.2 | 89.7 | 77.9 | 84.0 | 13.2 | 23.8 |
| All ages | 72.3 | 56.8 | 64.7 | 21.4 | 83.7 | 74.8 | 79.5 | 10.6 | 18.1 |

*Source: NSS 64th Round (2007-08) & 71st Round (2014)*

## II. लिंग आणि समाज : प्रौढ साक्षरता दर एक विश्लेषण

| Residence | Male | Female | Total | Gender Parity Index |
|---|---|---|---|---|
| **Rural** | 74.1 | 50.6 | 62.6 | 68% |
| **Urban** | 88.3 | 76.9 | 82.8 | 87% |
| **Total** | 78.8 | 59.3 | 69.3 | 75% |
| **Residence Parity** | **84%** | **66%** | **76%** | |

*Source: Census of India, Office of the Registrar General, India.*



## III. औपचारिक शिक्षण आणि समाज : वाढते शैक्षणिक अंतर

| Level of Education | Rural | | Urban | | Rural + Urban | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Male | Female | Male | Female | Male | Female |
| Not Literate | 198 | 376 | 90 | 190 | 165 | 320 |
| **Literate** | | | | | | |
| Without Schooling | 8 | 6 | 5 | 6 | 7 | 6 |
| Up to Primary | 377 | 336 | 285 | 280 | 349 | 319 |
| Upper Primary | 173 | 130 | 157 | 143 | 168 | 134 |
| Secondary | 118 | 80 | 150 | 133 | 128 | 96 |
| Higher Secondary | 71 | 45 | 114 | 102 | 85 | 62 |
| Diploma | 11 | 5 | 30 | 14 | 17 | 8 |
| Graduation | 37 | 18 | 126 | 96 | 64 | 42 |
| Post-graduatio and above | 8 | 4 | 43 | 35 | 18 | 14 |

स्त्रोत : NSS 71 वी फेरी 2014 (सारणीतील आकडे हे दर हजाराच्या प्रमाणात आहेत.)

वरील सर्व सारणींमधील आकडेवारीचे अध्ययन केल्यास असे स्पष्ट होते की, ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्या शिक्षणामध्ये खूप मोठे अंतर निर्माण झाले आहे. परिणामी ग्रामीण समाज शहरी समाजापेक्षा शैक्षणिक बाबतीत खूप मागासलेला आहे.

**1.8. ग्रामीण समाज व शहरी समाजातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीतील वाढत्या अंतराचे परिणाम:**

I. शहरी समाजाच्या तुलनेत ग्रामीण समाजाचे उच्च तथा व्यावसायिक शिक्षणातील प्रमाण खालावलेले आहे.

II. ग्रामीण समाजातील विद्यार्थ्यांमध्ये गळती व स्थगितीच प्रमाण वाढत आहे.

III. ग्रामीण समाजातील विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित उच्चशिक्षण न झाल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

IV. ग्रामीण समाजातील विद्यार्थ्यांमध्ये बालकामगारांचे प्रमाण वाढत आहे.

V. पर्यायाने ग्रामीण समाजातील सरकारी शाळा व अंगणवाड्या यांचे भविष्य धोक्यात आले आहे.

वरील सर्व कारणांचा परिणाम होऊन ग्रामीण समाजातील सामाजिक स्थिती सुद्धा अपेक्षित वेगाने सुधारत नसल्याचे दिसते. व्यावसायिक शिक्षणाच्या अभावामुळे ग्रामीण समाजातील सामाजिक जीवनमानाच्या परिवर्तनाची गती अतिशय मंद आहे.

## 2. संशोधन विषय :

प्रस्तूत संशोधन विषय “ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)” हा असून ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी, त्यांच्यातील वाढत चाललेल्या सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन करण्यासाठी तसेच त्यामागची कारणे, त्यांचे होणारे परिणाम व त्यावरील उपाय योजना यांचे अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

## 3. संशोधनाचे महत्व :

ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीमधील अंतराचे अध्ययन करणे व त्याचे परिणाम यांचे अध्ययन करण्यासाठी प्रस्तूत संशोधन विषय महत्वपूर्ण आहे. त्यासाठी ग्रामीण व शहरी समाजाची तुलनात्मक दृष्टया सामाजिक व शैक्षणिक स्थिती जाणून घेणे गरजेचे आहे. या संशोधन विषयाचे महत्व पुढील मुद्द्यांच्या आधारे अधोरेखित करता येते.

I. ग्रामीण व शहरी समाजातील वाढत चाललेल्या सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने या संशोशानाचे महत्व आहे.
II. असमतोल औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या शहरी समाज व ग्रामीण समाजातील वाढत चाललेल्या सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने या संशोशानाचे महत्व आहे.
III. पारंपरिक भारतीय समाजव्यवस्थेतील ग्रामीण समाजाचे शहरी समाजाच्या तुलनेत सामाजिक व शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाण कमी होण्यामागच्या कारणांचे अध्ययन करण्याचा दृष्टीने या संशोधन विषयाचे महत्व आहे.
IV. ग्रामीण समाजातील शिक्षण प्रणालीतील समस्यांचे अध्ययन करण्याचा दृष्टीने या संशोधन विषयाचे महत्व आहे.
V. ग्रामीण समाज व शहरी समाजात वाढत चाललेले सामाजिक व शैक्षणिक अंतर दूर करण्यासाठी त्यावर उपाययोजना सुचवण्याच्या दृष्टीने या संशोधन विषयाचे महत्व आहे.

## 4. संशोधनाची उद्धिष्टये :

I. ग्रामीण समाज व शहरी समाजात वाढत चाललेले सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन करणे.
II. असमतोल औद्योगिकीकरण, दळणवळण व पायाभूत सुविधा यांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या शहरी समाज व ग्रामीण समाजातील वाढत चाललेल्या सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन करणे.

III. पारंपरिक भारतीय समाजव्यवस्थेतील ग्रामीण समाजाचे शहरी समाजाच्या तुलनेत सामाजिक व शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाण कमी होण्यामागच्या कारणांचे अध्ययन करणे.

IV. ग्रामीण समाजातील शिक्षण प्रणालीतील समस्यांचे अध्ययन करणे.

V. ग्रामीण समाज व शहरी समाजात वाढत चाललेले सामाजिक व शैक्षणिक अंतर दूर करण्यासाठी त्यावर उपाययोजना सुचवणे.

## 5. संशोधनाचे गृहीतके :

I. ग्रामीण समाज व शहरी समाज यातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीतील अंतर वाढत आहे.

II. औद्योगिकीकरण, दळणवळण आणि पायाभूत सुविधा यांच्या अभावामुळे ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यात सामाजिक व शैक्षणिक असमतोल निर्माण झाला आहे.

III. भारतीय समाजातील ग्रामीण समाजाचे शहरी समाजाच्या तुलनेत सामाजिक व शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाण कमी होत आहे.

IV. ग्रामीण समाजामध्ये उपलब्ध असलेल्या शिक्षणप्रणालीमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

## 6. संशोधन विषयाची व्याप्ती व कालावधी:

### I. संशोधन विषयाची व्याप्ती :

संशोधन विषयाची व्याप्ती व कालावधी सुनिश्चित केल्या शिवाय संशोधनाला साचेबद्ध चौकटीत बांधता येत नाही व योग्य निष्कर्षापर्यंत पोहचता येत नाही. म्हणून प्रस्तुत संशोधन विषय व्यापक तथा विशाल असून संपूर्ण देशातील किंवा महाराष्ट्रातील ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतराचे अध्ययन न करता फक्त नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे. 'नांदेड जिल्हा' हीच या संशोधनाचे व्याप्ती आहे.

II. **संशोधन अध्ययनाचा कालावधी :**

संशोधन करतांना संशोधनाचा कालावधी ठरविणे अत्यंत महत्वाचे असते. योग्य कालवधीत नियोजितपणे संशोधन केल्यास संशोधनाला निश्चितच योग्य दिशा प्राप्त होऊन वेळेचा अपव्यय टळतो. तसेच संशोधकाला वेळेची मर्यादा लक्षात घेऊन जलद काम करण्याची प्रेरणा मिळते.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी तीन वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

| अ. क्र. | संशोधन कार्याचे स्वरूप | निश्चित कालावधी |
|---|---|---|
| I. | संबंधित साहित्याचा आढावा घेऊन प्रस्ताव तयार करणे | 6 महिने |
| II. | प्रकरण पहिले आणि प्रकरण दुसरे यांची मांडणी | 6 महिने |
| III. | मुलाखत अनुसूची तयार करणे, पायलट स्टडी, सर्वेक्षण आणि क्षेत्रभेट | 6 महिने |
| IV. | माहितीचे विश्लेषण करणे, निष्कर्ष व शिफारशी संबंधिचे संशोधनकार्य पूर्णत्वास नेणे | 6 महिने |
| V. | अंतिम संशोधन आराखडा सादर करणे | 6 महिने |
| VI. | शोधप्रबंध सादर करणे | 6 महिने |

## 7. संशोधन पद्धती:

कोणत्याही विषयाचा पद्धतशीर अभ्यास करणे म्हणजे शास्त्र होय. कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून जी मान्यता प्राप्त होते, ती मान्यता विषयामध्ये घटक कोणते यावर अवलंबून नसते तर ते अध्ययन शास्त्रीय पद्धतीने कशा प्रकारे हाताळता यावर अवलंबून असते. अध्ययन करणे हा संशोधनाचा महत्वाचा उद्धेश असतो.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने समस्येला अनुसरून योग्य संशोधन करणे आवश्यक असते. यामुळे संशोधन कार्य योग्य दिशेने कार्यान्वित होते. या संशोधन कार्यासाठी **"ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)"** असा संशोधाचा विषय निश्चित केल्या नंतर संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी समाजातील सामाजिक व शैक्षणिक अंतराचे तुलनात्मक अध्ययन करण्याचा विषय असल्याने संशोधन नि:पक्षपातीपणे व वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून निरीक्षण, मुलाखत अनुसूची, मुलाखत, अवलोकन व ग्रंथालयीन अध्ययन पद्धती या साधनांचा अवलंब केला जाणार आहे.

ग्रामीण समाज व शहरी समाजातील सध्यस्थितीतील सामाजिक व शैक्षणिक अंतराचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. यास्तव संशोधन कार्यासाठी 'वर्णनात्मक, सांख्यिकीय विश्लेषण व सर्वेक्षणात्मक पद्धतीचा' अवलंब केला जाणार आहे.

### 7.1 संशोधन आराखडा :

संशोधन आराखडा ही शास्त्रीय सामाजिक संशोधनातील प्रमुख पायरी आहे. कोणतेही कार्य पार पाडण्यासाठी सर्वप्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधकाला त्या कार्याचे पद्धतशीर नियोजन, त्याची रूपरेषा आणि मांडणीचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागते. संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी संशोधकाला प्रथमतः संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यात संशोधनाचा विषय, उद्देश, अध्ययन क्षेत्र, कालावधी, संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करणे, माहितीच्या संकलनाच्या पद्धती निश्चित करणे, नमुना निवडणे, तथ्य संकलनाची साधणे ठरविणे, तथ्यांचे विश्लेषण, संशोधन कार्याचा खर्च इत्यादी बाबी संशोधकाला ठरवाव्या लागतात.

प्रस्तुत संशोधन विषय **"ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)"** याविषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधक, **'वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन आराखडा आणि निदानात्मक संशोधन आराखडा'** यांचा उपयोग करणार आहेत.

## 7.2. नमुना निवड :

सामाजिक संशोधन करण्यासाठी गृहितकृत्ये व संशोधन आराखडा तयार केल्यानंतर संशोधकाला नमुना निवड करावी लागते. तथ्य संकलन करण्यासाठी विषयानुरूप नमुना निवडणे हे संशोधनाच्या पूर्णत्वासाठी आवश्यक असते. ज्यावेळी संशोधन विश्वातील एककांची संख्या अधिक असते त्यावेळी या समग्रातील एक छोटासा नमुना 'गट' म्हणून निवडणे महत्वाचे असते. हा गट समग्राचे प्रतिनिधित्व करणारा असला पाहिजे. अशाच गटाला आपण 'नमुना' म्हणतो.

जेंव्हा संपूर्ण जनसमुहावर एखाद्या कारकाचा झालेला परिणाम जाणून घेण्यासाठी प्रतिनिधिक एकक निवडले जातात व त्या आधारे त्या परिणामांचे मापन केले जाते तेंव्हा त्या पद्धतीला नमुना निवड पद्धती असे म्हणतात. साधारणतः समग्राची एकरूपता, समग्राची पर्याप्त प्रतिनिधीता आणि निष्कर्षांची प्रर्याप्तता इत्यादी आधारभूत तत्वे केंद्रीभूत मानून संशोधकाने या अध्ययनासाठी नमुना निवडण्याचे निर्धारित केले आहे.

नमुना निवडीच्या पद्धतीमध्ये संभाव्यता नमुनानिवड पद्धती आणि गैरसंभाव्यता नमुनानिवड पद्धती हे दोन प्रमुख प्रकार आहेत. संशोधन अध्ययन विषयाच्या समग्राची आकडेवारी उपलब्ध असल्यामुळे संशोधकाने एककाची निवड करण्यासाठी **संभाव्यता नमुना निवड पद्धतीच्या उपप्रकारातील 'साधा यादृच्छिक नमुना निवड' या उपप्रकाराच्या अंतर्गत 'लॉटरी पद्धतीचा' वापर करून गावांची निवड करण्याचा निश्चय केला आहे.**

नांदेड जिल्हा हे अध्ययन विश्व आहे. या जिल्ह्यात 16 तालुके आहेत. या प्रत्येक तालुक्यातून लॉटरी पद्धतीने 05 गावे निवडण्यात येतील. अशी एकूण 80 गावे निवडण्यात येतील. प्रत्येक तालुक्यातील गावांची सूची आणि कुटुंबांची सूची उपलब्ध असल्यामुळे यासुचीतील निवडलेल्या एकूण 80 गावातून लॉटरी पद्धतीनेच प्रत्येक गावातील 5 कुटुंबांची अशी एकूण 400 कुटुंबांची एकक म्हणून निवड करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या संशोधन अध्ययनात 'कुटुंब' हे एकक म्हणून निर्धारित करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील ही एकक म्हणून निवडण्यात आलेली 400 कुटुंब समग्राचे प्रतिनिधीत्व करणारी पर्याप्त एकक असतील, याविषयीची काळजी घेतली जाणार आहे.

## 7.3. तथ्य संकलनाची तंत्रे :

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलन पद्धतीस खूप महत्व आहे. कारण सामाजिक घटनांचे अध्ययन करूनच त्या घटनेसंबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते. तथ्य संकलनाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

I. **प्राथमिक स्त्रोत**

II. **दुय्यम स्त्रोत**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधन कार्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे.

### I. प्राथमिक स्त्रोत:

प्रस्तुत संशोधन कार्यात प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूची, निरीक्षण, अवलोकन, चर्चा व सर्वेक्षण या तंत्रांचा अवलंब करण्यात येणार आहे. संशोधक संशोधन अध्ययनासाठी निवडलेल्या संशोधन क्षेत्रातील गावात जाऊन एकक असलेल्या कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून मुलाखत अनुसुचीच्या आधारे तथ्यांचे संकलन करणार आहेत.

### II. दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन कार्यात दुय्यम स्त्रोत म्हणून विविध ग्रंथालयांत उपलब्ध असणारे संदर्भग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित शोधप्रबंध, संशोधन साहित्य, ज्ञानकोश, नियत कालिके, शासकीय अहवाल, वृतपत्रे, शासकीय संकेतस्थळे, इंटरनेट, विविध पत्रके संबंधित समित्यांचे अहवाल आणि वेगवेगळ्या शासकीय कार्यालयातून तसेच विश्वसनीय स्त्रोतांकडून माहिती संकलित केली जाणार आहे.

## 7.4. तथ्य विश्लेषण व अर्थनिर्वचन :

तथ्य विश्लेषण हा संशोधन प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक आहे. प्राप्त माहितीचे व्यवस्थित स्पष्टीकरण केल्याशिवाय माहितीचा बोध होत नाही. संशोधन समस्येच्या संकलित तथ्यांचा विचार करून त्यांचे विश्लेषण केले जाते.

प्रस्तुत संशोधनात संशोधक मुलाखत अनुसूचीद्वारे प्राप्त झालेल्या तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण, अर्थनिर्वचन करून तथ्यांचे सहसंबंध स्पष्ट करणार आहे. त्याशिवाय संशोधनाचे अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण होणार नाही म्हणून प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण, अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

## 8. संशोधन अहवालाची मांडणी :

संशोधन विषयाच्या अहवालाची मांडणी ही त्या संशोधनाची महत्त्वपूर्ण पायरी असते. कोणतेही संशोधन हे संशोधन अहवालामुळेच पूर्णत्त्वास जाते. **“ग्रामीण समाज व शहरी समाज यांच्यातील सामाजिक व शैक्षणिक अंतर : कारणे, परिणाम व उपाय (संदर्भ: नांदेड जिल्हा)”** या संशोधन विषयाच्या अहवाल मांडणीमध्ये एकूण सहा प्रकरणांचा समावेश असेल. ती प्रकरण मांडणी खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | : | प्रस्तावना |
| प्रकरण दुसरे | : | संबंधित साहित्याचा आढावा |
| प्रकरण तिसरे | : | संशोधन पद्धती |
| प्रकरण चौथे | : | ग्रामीण व शहरी समाजातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीतील अंतर |
| प्रकरण पाचवे | : | ग्रामीण व शहरी समाजातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीतील अंतराची कारणे, परिणाम व उपाय. |
| प्रकरण सहावे | : | निष्कर्ष व शिफारशी . |

**संदर्भ सूची :**


1. आगलावे प्रदीप (2000), *'सामाजिक संशोधन पद्धती',* नागपूर, साईनाथ प्रकाशन
2. आगलावे प्रदीप, *'ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र*, नागपूर, साईनाथ प्रकाशन.
3. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक (2007), *'सामाजिक संशोधन पद्धती'*, नागपूर, साईनाथ प्रकाशन
4. Chandra S. S. and Sharma R. K., *'Sociology of education'*, New Delhi, Atlantic Publication
5. लुंडबर्ग जे. ए., (1945), *'सोशल रिसर्च',* न्यूयॉर्क, मॅकग्राहिल
6. कऱ्हाडे बी. एम., *'ग्रामीण व नागरी समाजशास्त्र',* नागपूर, के'सागर प्रकाशन
7. यंग पी. व्ही., (1960), *'सायटीफिक सोशल सर्वे ॲण्ड रिसर्च'*, नवी दिल्ली, प्रिंटिंग हॉल ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
8. Census of India, 2011
9. NSS 71st Round, 2014
10. www.maharashtra.gov.in
11. www.wikipedia.org
12. www.zpnanded.in



**संशोधक**

मुक्कनवार श्रीकांत वसंतअप्पा

मु. पो. कलंबर (बु) ता. लोहा जि.नांदेड

**संशोधक मार्गदर्शक**

प्रा. डॉ. ए. टी. शिंदे

प्राचार्य

राजीव गांधी महाविद्यालय,

मुदखेड, जि. नांदेड